# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.08.2025** **वार:शनिवार**

1. विकसित भारतासाठी युवा पिढीने योगदान देण्याचे पंतप्रधानांचे आवाहन.
2. वस्तू आणि सेवा कर प्रणालीत सुधारणा करून सामान्यांवरचा बोजा कमी करणार- पंतप्रधानांचे सुतोवाच.
3. देशातल्या तरूणांसाठी नव्या रोजगार योजनेला स्वातंत्र्य दिनापासून सुरुवात.
4. राज्यभरात स्वातंत्र्यदिन उत्साहात, महाराष्ट्र देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास. आणि
5. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजाच्या संजीवन समाधी मंदिराचं सुवर्ण कलशारोहण.

**पंतप्रधान संबोधन**

एकोणांशिवा स्वातंत्र्य दिन देशभरात उत्साहात साजरा करण्यात आला. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करताना, भारताच्या अढळ, निश्चयी भूमिकेचा पुनरूच्चार केला. पंतप्रधानांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करत विकसित भारतासाठी युवकांच्या सामर्थ्यावरील विश्वास व्यक्त केला.

आत्मनिर्भर भारत, नवोन्मेष, नागरीकांचं सबलीकरण या सर्व मुद्द्यांबरोबरच देशाच्या कणखर भूमिकेवर ठाम राहाताना पंतप्रधानांनी, देश कोणत्याही आण्विक हल्ल्याच्या धमक्यांना भीक घालणार नाही असं ठणकावलं. सशस्त्र दलांना निर्णय घेण्याची मुभा दिली असून, त्यांना सरकारचा पूर्ण पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं. पाकिस्तानबरोबर झालेला सिंधू करार गेली सात दशके शेतकऱ्यांचे नुकसानच करत आल्याचे सांगून, सिंधू नदीच्या पाण्यावर केवळ भारताचाच हक्क असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विकसित भारताच्या उभारणीसाठी देशातल्या युवा पिढीने योगदान देण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले.....

**विकसित भारत का आधार भी है आत्मनिर्भर भारत। आत्मनिर्भरता का नाता हमारे सामर्थ्य से जुड़ा हुआ है और जब आत्मनिर्भरता खत्म होने लगती है, तो सामर्थ्य भी निरंतर क्षीण होता जाता है और इसलिए हमारे सामर्थ्य को बचाए रखने, बनाए रखने और बढ़ाए रखने के लिए, आत्मनिर्भर होना बहुत अनिवार्य है! ये पीढ़ी समृद्ध भारत के लिए नए कदम उठाए यही समय की मांग है।**

देशाने सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात मोठे यश मिळवले असून, या वर्षाच्या शेवटी भारतीय चिप बाजारात येतील. त्याशिवाय स्वच्छ उर्जा, खनिजे, अवकाश ही क्षेत्रेही लवकरच काबीज करण्याचा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

वस्तू आणि सेवा कर प्रणालीत सुधारणा करण्यात येईल अशी घोषणा करतानाच सामान्य नागरिकांवरील कराचा बोजा दिवाळीपर्यंत कमी होणार असल्याचं सुतोवाच त्यांनी केलं. देशातले तरूण हेच विकसित भारताचा आधार असल्याचं सांगून पंतप्रधानांनी युवकांसाठीच्या नव्या योजनेची घोषणा केली. ते म्हणाले..........

**हम नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स लेकर के आ रहे हैं, ये दिवाली के अंदर आपके लिए तोहफा बन जाएंगे, सामान्य मानवीय की जरूरत के टैक्स भारी मात्रा में काम कर दिए जाएंगे, बहुत बड़ी सुविधा बढ़ेंगी। हमारे एमएसएमई, हमारे लघु उद्यमी, इनको बहुत बड़ा लाभ मिलेगा। आज 15 अगस्त है, आज 15 अगस्त के ही दिन मेरे देश के युवाओं के लिए एक लाख करोड़ रुपए की योजना हम चालू कर रहे हैं, लागू कर रहे हैं।**

या अंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करत असलेल्या 1 कोटी 92 लाख तरूणांना सरकारकडून पंधरा हजार रुपये दिले जाणार आहेत. त्याशिवाय शेतकरी, पशुपालक यांच्या हिताला सरकारचं प्राधान्य असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

गेल्या 11 वर्षांत उद्यमशीलतेला प्रोत्साहन मिळत असल्याचं सांगून लाखो स्टार्टअप्स देशभरात सुरू झाल्याचं सांगताना मुलींना मुद्रा कर्ज योजनेचा फायदा झाल्याचं ते म्हणाले. गेल्या दहा वर्षात महिला स्वमदत गटांनीही अफाट कामगिरी केल्याचं सांगून, देशातल्या युवकांना नव्या कल्पना राबवा, त्यामध्ये मी साथ देईन असंही आश्वस्त केलं. उत्पादन क्षेत्रात एमएसएमईकडून जागतिक स्तरावर उत्पादन पाठवले जाते. उत्पादन क्षेत्राने, कमी दरांत दर्जेदार उत्पादन देण्यावर भर दिला तर आपली प्रगती निश्चित असल्याचं ते म्हणाले. दीर्घकाळ सरकार चालवताना अनेक अडचणी आल्या, मात्र दुसऱ्याची रेष छोटी करण्यात शक्ती वाया घालवण्यापेक्षा आपली रेष मोठी करण्यात ताकद लावली तर जगभरात आपला डंका वाजल्याशिवाय राहाणार नाही असंही ते म्हणाले. श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव देशभरात साजरा होताना, सुदर्शन चक्राप्रमाणे सुरक्षा प्रदान करणाऱ्या सुदर्शन चक्र योजनेच्या प्रारंभाचा संकेतही दिला. कृषी क्षेत्राची प्रगती, संस्कृती वारसा जपणारी ज्ञान भारतम् योजना, न्यायसंहिता, लखपती दीदी आदी विषयांचाही धांडोळा घेतला.

**<u>स्वातंत्र्य दिन</u>**

देशाचा 79 वा स्वातंत्र्य दिन राज्यभरात उत्साहात साजरा झाला. पुण्यात विधानभवन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण पार पडले. यावेळी नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. राज्यपालांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

तर मुंबईत मंत्रालयामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी देशात होणाऱ्या परकीय गुंतवणुकीपैकी 40 टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याचं तसंच, वस्तू निर्मिती, निर्यात आणि स्टार्ट-अप्समध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असल्याचं नमूद केलं. तसंच भविष्यात राज्य देशाच्या विकासाचे नेतृत्व करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ठाण्यात उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. ध्वजारोहणानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकारी तसंच व्यक्तींचा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती सभागृहात गौरव करण्यात आला.

तर उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण झाले. राष्ट्रविकासात सर्वांना सोबत घेऊन जाताना शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक यांना प्रगतीची योग्य संधी उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्याचं आवाहन पवार यांनी यावेळी केलं.

त्याशिवाय राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांमध्येही स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**<u>मिलिटरी बँड</u>**

स्वातंत्र्य दिनाच्या संध्याकाळी पुण्यात शनिवारवाडा आणि गांधीभवन इथं बॉम्बे सॅपर्स मिलिटरी बँडने सादरीकरण केले. इकोज ऑफ व्हॅलर ए ट्रिब्यूट थ्रू ट्यून्स अशी या संगीतमय कार्यक्रमाची संकल्पना होती. या कार्यक्रमातून ऑपरेशन सिंदूरच्या शौर्याला आणि भारतीय सशस्त्र दलांच्या अजोड धैर्याला अभिवादन करण्यात आलं. देशप्रेम, ऐक्य आणि स्वातंत्र्याचं रक्षण करणाऱ्या वीरांची स्मृती यानिमित्ताने जागवण्यात आली.

**<u>आळंदी मुख्यमंत्री</u>**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या साडेसातशेव्या जयंतीनिमित्त काल पुण्यातल्या आळंदी इथं ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरावर सुवर्ण कलशारोहण मुख्यंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आळंदी संस्थानचे प्रमुख विश्वस्त तसंच प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आपल्या संस्कृतीतील प्राचीन मूल्य जपण्याचे श्रेय वारकरी संप्रदायाला जाते. जात, धर्म भेदापलीकडे जाऊन वारकऱ्यांनी ऐक्य निर्माण केल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले...

**आमचा वारकरी हा समोरच्या वारकऱ्यामध्ये पांडुरंगाला पाहतो. तो त्याची जात पाहत नाही, पंथ पाहत नाही, भाषा पाहत नाही. त्याच्याकडे श्रीमंती आहे की गरिबी आहे पाहत नाही. तो त्याच्या पायामध्ये त्या ठिकाणी दंडवत करतो. त्याच्या पाया पडतो आणि त्याच्यामध्ये विठ्ठल पाहतो संत समाजाने. आमच्या सगळ्या समाजाला सांगितलं आपल्याला एकत्रित राहावं लागेल तरच आपण एकत्रित विकास करू शकू. तरच आपण एक चांगला समाज तयार करू शकू. आणि हीच संतांची शिकवण ही शाश्वत शिकवण आहे. आणि माऊलींची शिकवण देखील तीच शिकवण आपल्याला या ठिकाणी मिळालेली आहे.**

भगवान श्रीकृष्णाच्या भगवद्गीतेचे मराठी विवेचन करणाऱ्या माउलींच्या समाधीवर श्रीकृष्ण जयंतीच्या दिवशी कळसारोहण होण्याचा सुवर्णयोग जुळून आल्याचं त्यांनी नमूद केलं. माउलींच्या समाधी मंदिरावर हरिभक्त परायण नारायण महाराज जाधव यांच्या हस्ते 22 कोटी रुपयांचा 22 किलोच्या कळसाचे आरोहण करण्यात आलं. यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री सार्थ ज्ञानेश्वरी हे विविध भाषेतील ऑडिओ बुक उपलब्ध असलेल्या श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या संकेतस्थळाचे उद्घाटनही यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, शेकडो वर्षानंतर आजही माऊली अखंड आणि पवित्र अग्निहोत्राप्रमाणे जगाला ऊर्जा आणि प्रेरणा देत असल्याचं सांगितलं. माऊलींच्या मंदिराच्या महाद्वारातून प्रवेश करताना अहंकार गळून पडेल आणि सात्विकतेचा अनुभव भक्तांना मिळेल, असंही ते म्हणाले. तर आळंदी विकास आराखड्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही शिंदे यांनी यावेळी दिली.

**<u>गोकुळाष्टमी</u>**

जन्माष्टमीचा सण काल रात्री देशभरात सर्वत्र साजरा झाला; सर्व मंदिरांमध्ये रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती. मध्यरात्री भगवान श्रीकृष्ण जन्म आनंदात साजरा झाला. आज राज्यात सर्वत्र दहीहंडी उत्सव साजरा होत आहे.

**<u>नाशिक कुंभमेळा</u>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, नियोजित कामे पूर्ण करण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे आदेश कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी काल नाशिक इथं दिले. यासंदर्भात

काल विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. कामांचा प्राधान्यक्रम ठरवल्यास कामे वेळेत होण्याबरोबरच गुणवत्ता राखण्याची दक्षता घेण्याचे आदेशही महाजन यांनी यावेळी दिले.

**रानभाजी-यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यात काल रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आलं. रानभाज्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने पावसाळ्यात या महोत्सवाचे आयोजन केले जाते.

**पाऊसमान-लातूर, वाशिम**

वाशिम जिल्ह्यातील केंदवड शिरपूर मालेगाव कुकसा या परिसरामध्ये काल ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे शेतांमध्ये पाणी शिरल्याने उभी पीकं पाण्याखाली गेली आहेत. लातूर जिल्ह्यातील मांजरा, तेरणा आणि तावरजा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.